**नियमित दिवाणी कज्ञा क्र.४५/२०२१ मधील नि.क्र. १२ वरील आदेश**

( पारीत दिनांक – १८/०४/२०२४)

श्री. शंकर गणपती वांगळे वि. सखाराम रामू धनवडे

**CNR -MHKO130002272021**

१. प्रस्तुतचा अर्ज प्रतिवादीने त्याच्याविरुध्द दिनांक २०/०१/२०२४ रोजी निशाणी क्र. ११ वर झालेला 'उलटतपास नाही' असा आदेश रद्द करुन मिळणेकरीता दाखल केलेला आहे.

२. प्रतिवादीच्या कथनानुसार, प्रतिवादीने मुद्दामहून हजर राहून उलटतपास घेणे टाळलेले नाही. प्रस्तुत प्रतिवादी आजारी असल्याने मे.कोर्टात हजर राहू शकले नाहीत. तसेच प्रतिवादी यांचेकडून त्यांचे वकीलांना सदर कामाबाबत वेळेत कोणत्याही सुचना न मिळाल्याने वादी यांचा उलटतपास घेणे शक्य झाले नाही. प्रतिवादी यांनी वकीलांशी संपर्क साधलेला असून प्रतिवादी यांना प्रस्तुतचे काम चालविणेचे असल्याने वादी यांचा उलटतपास घेणेचा आहे. त्यामुळे, प्रस्तुत प्रतिवादी यांना वादी यांचा उलटतपास घेणेस परवानगी मिळणे न्यायाचे व गरजेचे आहे. प्रतिवादी यांचेविरुध्द झालेला 'उलटतपास नाही' चा आदेश रद्द झालेस वादीचे काहीही नुकसान होणार नाही. परंतु तसे न झालेस प्रतिवादी यांचे कशानेही भरुन न येणारे नुकसान होणार आहे. सबब, वरील कारणास्तव, प्रतिवादीविरुध्द झालेला 'उलटतपास नाही' असा आदेश रद्द करण्याकरीता सदरचा अर्ज दाखल केला आहे.

३. सदर अर्जावरती वादीने अर्जाच्या मागील बाजूस त्यांचे म्हणणे दाखल केले असून प्रस्तुत कामी प्रतिवादी यांना पुरेसी संधी देणेत आलेली आहे. प्रतिवादी यांनी हेतूपुरस्सर टाळाटाळ केलेली आहे. सबब, अर्ज नामंजूर करणेत यावा अशी वादीची विनंती आहे.

४. उभय बाजूंच्या वकीलांचा युक्तिवाद ऐकला.

५. अभिलेखाचे अवलोकन करता, प्रस्तुत प्रतिवादी विरुध्द दि. २०/०१/२०२४ रोजी 'उलटतपास नाही' असा आदेश पारित करण्यात आला आहे असे दिसून येते. तद्नंतर, दि. ११/०३/२०२४ रोजी प्रतिवादीने प्रस्तुतचा अर्ज दाखल केलेला आहे. प्रतिवादीच्या अर्जातील कथने ही शपथेवरती आहेत. त्यामुळे, ती ग्राहय धरावी लागतील. नैसर्गिक न्याय तत्त्वाचा विचार करता, वादीच्या साक्षीदाराचा उलटतपास घेण्याची संधी प्रतिवादीस देणे योग्य राहील, तसे न

झाल्यास नैसर्गिक न्याय तत्त्वाचे उल्लंघन होईल. सदरच्या अर्जामुळे व प्रतिवादी मुळे दाव्याच्या कामी जो विलंब झाला, त्याकरीता काही रक्कम खर्च स्वरुपात प्रतिवादीवरती बसविणे योग्य राहील. सबब, वरील सर्व कारणास्तव खालीलप्रमाणे आदेश पारीत करण्यात येतोः–

**– आ दे श –**

१) अर्ज (निशाणी क्र. १२) प्रतिवादी ने वादी यांना आज तारखेपासून ७ दिवसांच्या आत रक्कम रुपये २००/– ही खर्च स्वरुपात देण्याच्या अटीवर प्रतिवादीविरुध्द झालेला 'उलटतपास नाही' असा आदेश रद्द करण्यात येतो.

AMOL BHARAT JAWALE Digitally signed by AMOL BHARAT JAWALE Date: 2024.04.18 17:34:49 +0900

कागल. (अमोल भारत जवळे)

दिनांक – १८/०४/२०२४. सह. दिवाणी न्यायाधीश क. स्तर, कागल.